दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • ११० • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.२० फेब्रुवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
दर्‍याखोरे
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोलोरेना (रोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा



मान्यवरांचे वरोरा नगरीत



मा. कृपाल तुमाणे साहेब,
विधान परिषद आमदार,
महाराष्ट्र



मा. नरेंद्र भोंडेकरजी साहेब,
आमदार, भंडारा तथा समिती
प्रमुख, शिवसेना उपनेते



मा. किरण साळी,
युवासेना सचिव महाराष्ट्र



मा. किरण पांडव,
विदर्भ संघटक,
शिवसेना नेते



मा. मंगेश काशिकर
जिल्हा संपर्क प्रमुख,
नागपूर शिवसेना



मा. सिद्धेश बाळासाहेब अभंगे,
उत्तर महाराष्ट्र निरिक्षक



मा. शुभम नवले,
विभागीय सचिव युवासेना



मा. हर्षल उर्फ विक्रम शिंदे,
युवासेना कार्यकारणी सदस्य,
महा.राज्य निरिक्षक पूर्व विदर्भ

हार्दिक स्वागत...!

युवा सेना तालुका वरोरा

गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२५ ला, सांय. ७.३० वाजता
स्थळ :- कॉटन मार्केट ग्राऊंड, नविन नगर परिषद समोर, वरोरा

शिवसेना

शुभेच्छुक : **आलेख रट्टे**

मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून उल्हास नदी पूर नियंत्रण रेषा बाधितांना आश्वासन

बदलापूर । प्रतिनिधी

बदलापूर पश्चिमेकडील उल्हास नदीजवळ, बदलापूर गावाच्या वेशीवर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे मंगळवारी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. याप्रसंगी खासदार बाळ्या मामा म्हात्रे, आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, विधान परिषदेचे आमदार निरंजन डावखरे, शिक्षण आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, मुख्याधिकारी मारुती गायकवाड, भाजप जिल्हाध्यक्ष जितेंद्र टाकी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे यांनी केले. मनोगत व्यक्त करताना आमदार किसन कथोरे यांनी बदलापूरला एमआयडीसीकडून निधीबाबत सावत्रभावाची वागणूक मिळत असल्याने मोठमोठे प्रकल्प रखडल्याची खंत व्यक्त केली. तसेच, उल्हास नदीच्या पूर नियंत्रण रेषेमुळे लाखो नागरिक बाधित झाल्याची कैफियत मांडून या समस्येवर तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूरच्या धर्तीवर या समस्येवर तोडगा काढण्याचे संकेत दिले.

मुख्यमंत्री म्हणाले की, उल्हास नदीवर काही धरणे बांधण्याचे काम सुरू असून, ती पूर्ण झाल्यानंतर पूररेषा आपोआप कमी होईल आणि बाधित नागरिकांना दिलासा मिळेल. यासोबतच, उल्हास नदीतील गाळ काढून खोलीकरण करण्याचे काम हाती घेतले जाईल. तसेच, नदीतील सांडपाणी व घाण नाले शोधून त्यांचे स्वच्छीकरण केले जाईल. त्यांनी असेही नमूद केले की, उल्हास नदी खोरे हे कोकणातील सर्वात मोठे खोरे असून, मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे त्याचे योग्य नियोजन करणे आणि ते निर्मळ बनवणे ही काळाची गरज आहे.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, स्वदेशी, स्वधर्म आणि स्वभाषा जिवंत आहेत ते छत्रपती शिवाजी महाराजांमुळे. त्यामुळे बदलापुरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आपल्यासाठी प्रेरणास्थान आहे. त्यापासून प्रेरणा घेत आपण पुढील वाटचाल करूया.एमआयडीसीचा निधी बदलापूरसाठी मिळावा यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन देत मुख्यमंत्री म्हणाले की, नगर विकास विभागामार्फत पाणीपुरवठा योजनेचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा केली जाईल. नवीन विकास नियंत्रण नियमावलीत पूररेषेत कुठे बांधकाम करता येईल, याबाबत सुधारित नियम तयार करण्याचा विचार आहे. कोल्हापूरमध्ये हा प्रयोग यशस्वी ठरला आहे आणि उल्हास नदी परिसरातही तो लागू करता येईल.आमदार किसन कथोरे यांच्या मंत्रिपदाबाबत भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले, आमदार किसन कथोरे मंत्रीपदासाठी पात्र आहेत. जे काम मंत्री करू शकत नाहीत, ते कथोरे करीत आहेत. प्रत्यक्ष मुख्यमंत्री त्यांच्या पाठीशी आहेत. त्यामुळे चिंता करण्याची गरज नाही, योग्य वेळी ते मंत्री होतील.



राहुरीत बिबट्याचा धुमाकूळ

वनविभागाच्या निष्काळजी पणावर शेतकऱ्यांचा रोष



राहुरी । प्रतिनिधी

तालुक्यात बिबट्यांचा संचार वाढल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, वनविभागाच्या निष्क्रियतेमुळे बिबट्याचे हल्ले सातत्याने वाढत असल्याचा आरोप होत आहे. विशेषतः वनक्षेत्रपाल युवराज पाचारणे यांच्या निष्काळजीपणामुळे बिबट्यांचा मुक्त संचार वाढल्याचे बोलले जात आहे. राहुरी तालुक्यातील मानोरी शिवारात बिबट्याने एका शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला केला. मात्र, सुदैवाने विठ्ठल रामभाऊ हापसे हे शेतकरी बालंबाल बचावले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.ऊस तोडणी कामगारांनी ऊसाच्या शेतात बिबट्याचा वावर पाहिल्यानंतर ही माहिती शेतकऱ्यांना दिली. बिबट्याला पाहण्यासाठी जमलेल्या शेतकऱ्यांवर अचानक हल्ला करत एका शेतकऱ्याला गंभीर जखमी केले. त्यांच्या हाताला आणि दंडाला गंभीर जखमा झाल्या असून त्यांच्यावर तातडीने रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत.वनविभागाने तातडीने उपाययोजना न केल्यास मोठ्या प्रमाणावर आंदोलन छेडण्यात येईल, अशी चेतावणी स्थानिक शेतकऱ्यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांची मागणी तातडीने पिंजरे लावा!

या घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून बिबट्याला पकडण्यासाठी तत्काळ पिंजरे लावण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. मात्र, वनविभागाच्या दिरंगाईमुळे बिबट्यांचा वावर वाढला असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

वनविभागाच्या निष्क्रियते विरोधात आंदोलनाचा इशारा

वनक्षेत्रपाल युवराज पाचारणे यांच्या निष्काळजीपणाविरोधात काही सामाजिक आणि राजकीय संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वनमंत्री गणेश नाईक यांच्या दालनासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मायबाप सरकार पवनूरच्या शेतकऱ्यांच्या वेदनेची दखल घेणार कधी?

शेतकऱ्यांची देवेंद्रसरकारला आर्त हाक

वर्धा । प्रतिनिधी

वर्धा तालुक्यातील पवनूर ते सुकळी उबार रस्त्यावर शेकडो शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याची समस्या उभी आहे. मागील ३० वर्षांपासून शेतकऱ्यांनी सरकारकडे मागणी केली आहे की, या रस्त्याचा कायमस्वरूपी पांधन रस्ता तयार करून दिला जावा. परंतु, सरकारी लालफीतशाहीत अडकलेले अधिकारी आणि जनप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यात उदासीन राहिले आहेत. या कारणामुळे या परिसरातील जवळपास ८० एकर शेती पडीत पडली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनात, पवनूर सुकळी उबार रस्त्याच्या बाजूला असलेल्या नाल्यामुळे सांडपाणी आणि पावसाचे पाणी रस्त्यावर जमा होऊन त्याची स्थिती अत्यंत खराब झाली आहे. या रस्त्याचा वापर शेतकऱ्यांसाठी अतिशय उपयुक्त होता, परंतु खराब स्थितीमुळे शेती कशी करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे.

गावकऱ्यांनी मागील ३० वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्तीचा पाठपुरावा केला आहे. तसेच, तत्कालीन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या हस्ते या रस्त्याच्या नूतनीकरणासाठी जिल्हा गौण खनिज विकास निधीचा उपयोग होऊ शकतो, अशी सूचना केली होती. मात्र, अजूनही या रस्त्याची समस्या सुटलेली नाही.



शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन पाठवून त्यांच्याकडून या समस्येचे तातडीने समाधान करण्याची मागणी केली आहे. निवेदनाची प्रति आमदार राजेश बकाने, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, जिल्हाधिकारी वानमती सी., पालक सचिव अनुप कुमार यादव, आशा पठाण आणि केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांना पाठवली आहे.यावरून स्पष्ट आहे की, शेतकऱ्यांची समस्या आता गंभीर बनली आहे आणि त्या सोडविण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

लोकमान्य महाविद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी–डॉ.माने यांचे मार्गदर्शन

वरोरा । प्रतिनिधी

लोकमान्य महाविद्यालयाच्या इतिहास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. बुधवार, १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी प्राचार्य डॉ. जयश्री शास्त्री यांनी भूषवले, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. तानाजी माने उपस्थित होते.

यावेळी डॉ. माने यांनी शिवाजी महाराजांच्या अद्वितीय नियोजन व व्यवस्थापन कौशल्यावर तसेच त्यांच्या लोककल्याणकारी धोरणांवर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात डॉ. शास्त्री यांनी महाराजांच्या जीवनचरित्रातील विविध पैलूंवर चर्चा केली.कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख डॉ. दीपक लोणकर यांनी केले, तर आभार प्रा. रोशनी महाकुलकर यांनी मानले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रवींद्र शेंडे व सहकार्यक्रम अधिकारी डॉ. श्रीकांत पुरी यांचे विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रामदास कदम यांच्यासाठी उद्धव ठाकरेंचा अपमानाचा प्लान होता–शिंदे यांचा गौप्यस्फोट

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना नेते रामदास कदम यांच्याबाबत उद्धव ठाकरे यांचा अपमानाचा प्लान तयार होता, असा खळबळजनक गौप्यस्फोट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. मनोहर जोशी यांच्यासोबत जे घडले, तेच रामदास कदम यांच्यासोबत होणार होते, असा दावा त्यांनी केला.

विलेपार्लेमध्ये शिवसेनेतून शिंदे गटात प्रवेश करणाऱ्या उपविभागप्रमुख जितेंद्र जनावळे यांच्या स्वागत सोहळ्यात बोलताना एकनाथ शिंदे यांनी या विषयावर भाष्य केले. मुख्यमंत्री आणि लोकसभेचे सभापती राहिलेले मनोहर जोशी यांना उद्धव ठाकरे यांनी सभेतून खाली उतरवले होते. रामदास कदम यांच्यासोबतही तोच प्रकार होणार होता. मात्र, मी तो थांबवला, असे शिंदे म्हणाले.बाळासाहेब कधीही पक्षातील लोकांमध्ये भेदभाव करत नव्हते. पण उद्धव ठाकरेंनी कार्यकर्त्यांना कमजोर केले. त्यांनी कार्यकर्त्यांना सोडले आणि हिंदुत्वही सोडले. त्यामुळे आम्हाला बाहेर पडावे लागले, असे शिंदे म्हणाले.विधानसभा ही झलक होती, मुंबई महापालिका बाकी आहे. विरोधकांनी कितीही देव पाण्यात बुडवले तरी आमच्यात कोल्ड वॉर नाही. आमचे युद्ध हे विकासविरोधकांशी आहे, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले



जोशी यांना उद्धव ठाकरे यांनी सभेतून खाली

छत्रपती शिवरायांच्या विचारांचा महायुती सरकारच्या कामकाजात प्रतिबिंब–ना.राधाकृष्ण विखे पाटील



अहिल्यानगर । प्रतिनिधी

स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरवताना रयतेचे राज्य स्थापन करणे हीच छत्रपती शिवाजी महाराजांची सर्वोच्च इच्छा होती. त्यांच्या विचारांचा जागर करत महायुती सरकार राज्यात कार्यरत असून, शासनाच्या विविध निर्णयांत शिवरायांच्या तत्वज्ञानाचे प्रतिबिंब असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त ना. विखे पाटील यांनी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखाना कार्यस्थळी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून अभिवादन केले. प्रवरा नगर येथे व्यापारी मित्र मंडळ, तसेच लोणी खुर्द व बुद्रुक येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमांना उपस्थित राहून त्यांनी महाआरतीत सहभाग घेतला. माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी या कार्यक्रमास उपस्थित होते.लोणी येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना ना. विखे पाटील म्हणाले, शिवरायांनी स्थापन केलेले स्वराज्य अखंड हिंदुस्थानचे बलस्थान आहे. त्याग आणि संघर्षातून मिळालेले स्वराज्य टिकवणे हीच खरी शिवभक्ती आहे. शिवाजी महाराजांचा इतिहास हा आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून, तो प्रत्येक घराघरात पोहोचला पाहिजे. महाराजांनी जिंकलेल्या किल्ल्यांचा अभ्यास, त्यांच्या प्रशासकीय कुशलतेचे व्यवस्थापन समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

रयतेच्या राज्याची संकल्पना शिवरायांनी कृतीत उतरवली आणि आज महायुती सरकारही त्याच विचाराने लोकहिताचे निर्णय घेत असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले.लोणी खुर्द येथे ना. विखे पाटील यांच्या हस्ते शस्त्रपूजन संपन्न झाले. डॉ. विखे पाटील कारखान्यावर शिवरायांच्या जीवनावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सर्व शाळा-महाविद्यालयांत विद्यार्थ्यांनी शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. लोणी आणि परिसर भगव्या झेंड्यांनी सजला होता. युवक आणि महिलांनी छत्रपती शिवाजी महाराजांना जय भवानी, जय शिवाजी च्या गजरात अभिवादन केले.

गंगापूरमध्ये छत्रपती शिवरायांच्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर; सुवर्ण सोशल फाउंडेशनचा उपक्रम

गंगापूर । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सुवर्ण सोशल फाउंडेशनच्या वतीने गंगापूर येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष संजय भाऊ जाधव, संतोष शेठ अंबीलवादे, उपपोलीस निरीक्षक अनिल झोरे, सुरेश नेमाडे, मुकुंद जोशी, सोपान देशमुख, तुलाराम साटाले आणि बाबासाहेब लगड यांच्या हस्ते संपन्न झाले.

या शिबिरात छत्रपती संभाजीनगर येथील अमृता ब्लड बँक यांच्या सहकार्याने रक्त संकलन करण्यात आले. सुवर्ण सोशल फाउंडेशनचे प्रतीक चव्हाण, पंकज डुकरे, शरद दारुंटे, कृष्णा सोळके, ओमकार जाधव आणि महेश इथापे यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रक्तदानाच्या माध्यमातून समाजात सहकार्याची आणि सेवा भावनेची प्रेरणा निर्माण होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.



“रक्तदान हा एक महान कार्य आहे, ज्यामुळे अनेकांचे प्राण वाचतात. आमच्या फाउंडेशनच्या माध्यमातून हे शिबिर आयोजित करणे ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. – संजय जाधव, माजी नगराध्यक्ष,गंगापूर नगरपालिका

महाडमध्ये ७४ वर्षीय वृद्धाचा पाण्यात बुडून मृत्यू

महाड । प्रतिनिधी

महाड तालुक्यातील कोकरे तर्फे गोवेल येथे सावित्री खाडीच्या जेटीजवळ ७४ वर्षीय वृद्धाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. आत्माराम दाजी आंबेकर असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

आत्माराम आंबेकर हे १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता घरातून बाहेर पडले, मात्र सायंकाळी त्यांचा मृतदेह पाण्यात आढळून आला. खाडीकिनारी शौचालयास जात असताना अचानक पाय घसरल्याने ते पाण्यात पडले आणि गुदमरून त्यांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती पोलिसांनी दिली आहे.रुग्णवाहिका चालक रऊफ पठाण यांनी मृतदेह महाड ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी नेला. महाड तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक राजेंद्र कुमार सानप आणि पोलीस उपनिरीक्षक के.एफ. खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आर.पी. धोत्रे अधिक तपास करत आहेत.



शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा फिस्कूटी येथे भव्य सत्कार समारंभ आणि सांस्कृतिक संमेलन

मुल । रोहित कामडे





जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा फिस्कूटी येथे १७ फेब्रुवारी २०२५ रोजी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये शाळेतील माजी आणि सध्याच्या सेवेत असलेल्या ४२ मान्यवरांचा शाल, स्मृतीचिन्ह आणि अभिनंदन पत्र देऊन गौरव करण्यात आला. या सोहळ्यात स्थानिक शिक्षण क्षेत्रातील कार्याचा सन्मान करण्यात आला आणि शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून आपल्या कलेचे प्रदर्शन केले.कार्यक्रमाची सुरुवात सरपंच नितीन गुरनुले यांच्या हस्ते झाली, ज्यात सेवानिवृत्त निरीक्षक धनराज खोब्रागडे यांनी सहउद्घाटन केले. दीपप्रज्वलनाचे मानाचे कार्य सेवानिवृत्त शिक्षक सदाशिवराव शेंडे आणि मनोहर वाडगुरे यांनी केले, ज्यामुळे कार्यक्रमाला एक पवित्र प्रारंभ मिळाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शा.व्य.स. अध्यक्षा जोत्सना नितीन राऊत उपस्थित होत्या, तर उपाध्यक्ष म्हणून सुभाष गिरडकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शाळेच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानामुळे गौरवलेल्या सर्व माजी आणि सध्याच्या कर्मचार्यांचा शाल, स्मृतीचिन्ह आणि अभिनंदन पत्र देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रमुख मान्यवर म्हणून मनोहर वाडगुरे, दिलीप शेंडे, कविराज मानकर, अशोक शेंडे, बुध्देश्वर मानकर, नामदेव गावतुरे, पुरुषोतम मोहुर्ले, दत्तू निकोडे, परमानंद जेंगठे, रुषीदेव चौधरी, रामकृष्ण महाडोरे, पुरुषोतम कावळे, उत्तम गोवर्धन, मालण चौधरी, वर्षा मानकर, भाऊराव गोंगले, राजू जिल्हेवार, प्रशांत मोहुर्ले, प्रकाश महाडोरे, अश्विनी आंबोरकर, विठ्ठल गुरनुले, मुकेश म्यॅकलवार, आणि रोहित कामडे यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात शालेय विद्यार्थ्यांनी एक भव्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, नाटिका आणि कलात्मक सादरीकरणांच्या माध्यमातून आपल्या कला कौशल्याची प्रगती केली आणि प्रेक्षकांवर एक नवा ठसा सोडला. कार्यक्रमाने शाळेतील कलेच्या क्षेत्रात उत्कृष्टतेची नवी उंची गाठली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, मुख्याध्यापिका रत्नमाला गेडाम आणि शिक्षकवृंद यांनी आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. यावेळी कार्यक्रमाचे संचालन विजय भोयर यांनी केले, तर आभार प्रदर्शन गीता साखरे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाने शाळेतील विद्यार्थ्यांना आणि स्थानिक समाजातील व्यक्तींच्या योगदानाला योग्य मान्यता दिली आहे. या कार्यकमाने फिस्कूटी गावातील शिक्षण आणि संस्कृती क्षेत्रात एक नवा रंग दाखवला आणि त्याला निश्चितच दीर्घकालीन प्रभाव पडेल.

दिव्यांगांना स्वतःच्या पायावर उभे करणार-खा.नीलेश लंके

हंगा येथे दिव्यांग रोजगार व व्यवसाय कार्यशाळा

प्रत्येक तालुक्यात व्यवसाय मार्गदर्शन शिबिर

आज बेरोजगारीचा प्रश्न भयंकर आहे. बेरोजगारी वर मात करण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यासंदर्भात आपली काही अधिकाऱ्यांशी चर्चा झालेली आहे. यासंदर्भात संबंधित केंद्रीय मंत्र्यांशी आपली चर्चा झाली असून प्रत्येक तालुक्यात लवकरच उद्योग मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे खा नीलेश लंके यांनी सांगितले.

उद्योगांना ३० ते ७० टक्क्यांपर्यंत अनुदान

आज नोकरी मिळणे मुश्किल झाले असून तरूणांना व्यवसायाचे मार्गदर्शन देउन त्यासाठी आर्थिक मदत दिली तर तरूण उद्योजक होउ शकतील. केंद्र सरकारच्या माध्यमातून ३५० ते ४०० असे उद्योग आहे की त्यांना ३५ ते ७० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येते. ग्रामीण भागातील बेरोजगारांना या योजनांची माहीती नाही. या योजनांची माहीती मिळावी यासाठी उद्योग मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. जास्तीत जास्त बेरोजगारांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम आपण करणार आहोत.

-खासदार नीलेश लंके,लोकसभा सदस्य



हंगा येथे दिव्यांग बांधवांसाठी आयोजित करण्यात आलेल्या दिव्यांग महारोजगार व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत खा. नीलेश लंके यांनी मार्गदर्शन केले.

पारनेर । प्रतिनिधी

दिव्यांगांना शासकीय मदत मिळवून देण्यापेक्षा ते स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजेत. प्रत्येक दिव्यांग हा कोणावर तरी अवलंबून असतो. आमच्या दिव्यांग प्रतिष्ठानची एकच इच्छा आहे की दिव्यांग बांधव हा स्वतःच्या पायावर उभा राहिला पाहिजे. तो त्याच्या कुटूंबाचा कुटूंबप्रमुख झाला पाहिजे असा निर्धार खासदार नीलेश लंके यांनी केला.

सी बी कोरा ग्रामोद्योग संस्था, सुक्ष्म, मध्यम व लघू मंत्रालयाचा खादी व ग्रामोद्योग आयोग व नीलेश लंके प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यामाने सोमवारी हंगा येथे दिव्यांग महारोजगार व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत खासदार नीलेश लंके यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील दिव्यांग बांधव मोठया संख्येने सहभागी झाले होते. यावेळी खादी ग्रामोद्योग संघ, जिल्हा परिषदेचे समाजकल्याण अधिकारी तसेच समाज कल्याण विभागाचे सहाययक आयुक्त उपस्थित होते. यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, दिव्यांगांसाठीच्या केंद्र व राज्य सरकारच्या योजना तसेच दिव्यांगांसाठी काम करणारे महामंडळे यांच्या संयुक्त विद्यमाने या मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विभागांच्या योजनांची माहीती देत या योजनांचा लाभ दिव्यांगांना देण्याची ग्वाही दिली. काही अधिकाऱ्यांनी जागेवरच मंजुरी देत सकारात्मक भुमिका घेतली. त्याचा नगर दक्षिण मतदारसंघातील दिव्यांग बांधवांना निश्चितपणे होईल असा विश्वास खा. लंके यांनी यावेळी व्यक्त केला.

चित्रकार प्रा.प्रदीप नागतुरे यांच्या कलाकृतीला राज्यस्तरीय पुरस्कार



अमरावती । प्रतिनिधी

डॉ. भाऊसाहेब देशमुख आर्ट्स अकादमी, अमरावती यांच्या राज्यस्तरीय चित्र व शिल्प स्पर्धेत बाबासाहेब नाईक चित्रकला महाविद्यालय, पुसद येथील प्रा. चित्रकार प्रदीप नागतुरे यांच्या कलाकृतीने बाजी मारली. त्यांना व्यावसायिक विभागातून 'बाळकृष्ण दाभाडे स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

स्पर्धा १४ ते १६ फेब्रुवारी २०२५ दरम्यान ललित कला भवन, नारायण नगर, अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती. यात महाराष्ट्रभरातील २५० चित्रकार व शिल्पकारांनी सहभाग घेतला होता. प्रा. प्रदीप नागतुरे यांच्या चित्रकृतीची विशेष निवड करण्यात आली.पुरस्कार वितरण सोहळ्याला अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त व प्रशासक सचिन कलंत्रे, नगरसेवक प्रदीप हिवसे, वनराई संस्थेचे अध्यक्ष मधुभाऊ घारड, तसेच शिवाजी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य मनीष चोपडे व बाबासाहेब ढोणे चित्रकला महाविद्यालय, अकोला येथील प्राचार्य गजानन बोबडे उपस्थित होते.प्रा. नागतुरे यांनी आपल्या कलाकृतीत आदिमानवांनी दगडावर कोरलेल्या मानवाकृती, प्राणी व प्रतीकात्मक चिन्हांचा वापर करून शिकार आणि उपजीविकेच्या संघर्षाचे



सौंदर्यपूर्ण दर्शन घडवले आहे. त्यांच्या या कलाकृतीने प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली.या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. वजाहत मिर्झा, सचिव सज्जाद मिर्झा, प्राचार्य योगिता शेळके, प्रा. जफर खान, नागोराव गायकवाड, मुक्तरंग कला अकादमीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सोनटक्के, तसेच तेजसिंग भोसले चित्रकला महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य नरेंद्र पाटील व श्री आर्ट कला वर्गाचे संस्थापक सारंग नागठाणे यांनी प्रा. नागतुरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनीही आपल्या प्राध्यापकाचा गौरव करत आनंद व्यक्त केला.

सुरक्षित आणि समृद्ध शिर्डीसाठी शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहू-डॉ.सुजय विखे



अहिल्यानगर । प्रतिनिधी

शिर्डीमध्ये नुकत्याच घडलेल्या दुर्दैवी घटनेत निष्पाप नागरिकांनी आपले प्राण गमावले. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागावे. शिर्डीतील माता-भगिनी सुरक्षित राहाव्यात आणि समृद्ध शिर्डी घडवण्यासाठी विखे पाटील परिवार सातत्याने प्रयत्नशील राहील, असे प्रतिपादन डॉ. सुजय विखे पाटील यांनी छत्रपती शासनाच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात केले.

यावेळी छत्रपती शासनाच्या वतीने घटनेतील मृत्युमुखी पडलेल्या आणि जखमी झालेल्यांच्या कुटुंबियांना सात लाख रुपयांचे धनादेश प्रदान करण्यात आले. तसेच शिर्डीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या ३०० कुटुंबांना घरगुती आवश्यक वस्तूंचे वाटपही करण्यात आले. विखे पाटील परिवाराच्या वतीनेही तिन्ही कुटुंबांना सात लाख रुपयांची मदत देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

शिर्डीत शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी यावेळी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. ग्रामस्थांनी एकमुखाने अनिष्ट प्रवृत्तींचा विरोध करण्याचा आणि समाजहिताचे निर्णय घेण्यासाठी एकोप्याने राहण्याचा निर्धार केला. याबद्दल डॉ. सुजय विखे पाटील यांनी ग्रामस्थांचे आभार मानले.शिर्डीच्या विकासासाठी पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून शिर्डी बस स्थानकाच्या समोर शिवसृष्टी उभारण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. तसेच शिर्डी सुरक्षित राहावी आणि चुकीची कृत्ये करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी पोलिसांनी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.साईबाबा संस्थानच्या टोकन प्रणालीबद्दल समाधान व्यक्त करताना त्यांनी यामुळे मंदिर परिसरात दररोज १०,००० लोकांची गर्दी कमी झाल्याचे सांगितले. मात्र, हे १०,००० लोक कोण होते? याबाबत त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.शिर्डीच्या सुरक्षिततेसाठी आणि भक्तांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील. कोणीही अन्यायग्रस्त झाल्यास विखे पाटील परिवार त्यांच्या पाठिशी ठामपणे उभा राहील. समाजहितासाठी सत्य बोलायचे असेल, तर त्यासाठी कोणताही विरोध पत्करण्यास आम्ही तयार आहोत, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.यावेळी शिर्डीत छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्याची घोषणा करण्यात आली.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने शिवजयंती निमित्त लाठीकाठी प्रात्यक्षिकांद्वारे शिवरायांना मानवंदना

चंद्रपूर । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने आयोजित लाठीकाठी प्रशिक्षण शिबिरातील विद्यार्थ्यांनी प्रभावी प्रात्यक्षिके सादर करत शिवरायांना युद्धकौशल्याच्या माध्यमातून मानवंदना दिली. या विद्यार्थ्यांचा आमदार किशोर जोरगेवार यांनी 'अम्माचा टिफिन' देऊन सत्कार केला.

शिवकालीन युद्धतंत्राचा अभिमान नव्या पिढीला मिळावा आणि लुप्त होत चाललेल्या या क्रीडा प्रकाराला प्रोत्साहन मिळावे यासाठी भारतीय जनता पक्षाचे



आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने नेहरू विद्यालय येथे लाठीकाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात प्रशिक्षक मेघा राहुल मुधोळकर यांनी सुमारे ३० युवक-युवतींना प्रशिक्षण दिले. आज छत्रपती शिवाजी महाराज चौकात या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आमदार किशोर जोरगेवार कार्यक्रमस्थळी पोहोचताच विद्यार्थ्यांनी लाठीकाठीची प्रात्यक्षिके सादर करून शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी आमदारांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना पुढील प्रशिक्षणासाठी प्रोत्साहित केले.

छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम, त्यांचे लढाऊ तंत्र आणि शौर्य नव्या पिढीने आत्मसात करावे, यासाठी या प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मरक्षण कौशल्ये विकसित होतील आणि आत्मविश्वास वाढेल, असे आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले.या उपक्रमामुळे शिवकालीन युद्धकला जिवंत राहून नव्या पिढीला प्रेरणा मिळणार आहे.

सातारा नगरपरिषद आरोग्य कर्मचाऱ्याच्या मृत्यूस जबाबदार कोण? चौकशीची मागणी तीव्र

सातारा । प्रतिनिधी

नगरपरिषद आरोग्य विभागातील कर्मचारी सोमनाथ वायदंडे यांचा मृत्यू हा आरोग्य विभाग प्रमुख आणि मुकादम यांच्या त्रासाला कंटाळून झाल्याचा आरोप त्यांचे सहकारी आणि कुटुंबीयांनी केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, मृत्यू होण्याच्या दोन दिवस आधीपासूनच सोमनाथ वायदंडे यांच्या छातीत तीव्र वेदना होत होत्या, तरीही त्यांनी जबाबदारीने आपले काम सुरू ठेवले. त्यांनी उपचारासाठी सुट्टीसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे विनंती केली होती. मात्र, आरोग्य विभाग प्रमुख आणि मुकादम यांनी सुट्टी नाकारल्याने वेळेत उपचार मिळू शकले नाहीत, आणि यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप केला जात आहे.

या घटनेने आरोग्य कर्मचाऱ्यांच्या कामाच्या अत्यंत कठीण परिस्थितीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. तसेच, मानवाधिकार आयोगाने सुचवलेल्या उपाययोजना अंमलात आणण्यात झालेल्या ढिलाईमुळेच हा मृत्यू झाल्याचा आरोप केला जात आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी तत्काळ पिडीत कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांच्या व्यथा ऐकाव्यात तसेच आरोग्य विभाग प्रमुख आणि मुकादम यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी करून गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी होत आहे.ही घटना केवळ एका कर्मचाऱ्याचा मृत्यू नसून, संपूर्ण आरोग्य व्यवस्थेतील हलगर्जीपणाचे गंभीर उदाहरण ठरते. प्रशासनाने यावर तत्काळ कारवाई केली नाही, तर कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होण्याची शक्यता आहे.



खा.लंके यांनी लक्ष वेधताच दिल्लीचे अधिकारी पारनेरात!

केंद्रीय उर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक रखडलेल्या सिंगल फेज योजनेचा प्रश्न

मी शेतकऱ्यांच्या पाठीशी

वीज आणि शेतकरी यांचे नाते जवळचे आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. त्यासाठी महावितरणच्या कामामध्ये गती यावी आणि शेतकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळाव्यात यासाठी माझे प्रयत्न सुरूच राहणार आहेत. –खासदार नीलेश लंके,लोकसभा सदस्य

शेती पंपांना दिवसा वीज हवी

महावितरणकडून शेती पंपांसाठी रात्रीच्या वेळी वीज पुरवठा करण्यात येतो. अहिल्यानगर मतदारसंघातील अनेक भागात बिबटया तसेच अन्य वन्य प्राण्यांची संख्या मोठी असून त्यांच्यापासून शेतकऱ्यांना धोका आहे. त्यासाठी शेतीपंपांना आठवडाभर रात्रीऐवजी दिवसा काही काळ वीज पुरवठा करता येईल का याची चाचपणी करण्याच्या सुचना खा. लंके यांनी यावेळी केल्या. तसेच सिंगल फेज योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदाराने कामाचा वेग वाढविला नाही तर त्यास ब्लॅक लिस्ट करण्यात यावे असेही लंके यांनी सुचित केले.



महावितरणच्या रेंगाळलेल्या कामांसंदर्भात खा नीलेश लंके यांनी दिल्लीतील उर्जा समितीच्या बैठकीत प्रश्न उपस्थित केल्यानंतर केंद्रीय उर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांनी पारनेर येथे येऊन आढावा घेतला.

पारनेर । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील घरगुती ग्राहकांना २४ तास वीज मिळावी यासाठी गेल्या दोन वर्षांपासून राबविण्यात येत असलेल्या आरडीएसएस सिंगल फेज योजनेचे काम पुर्ण करण्यात होत असलेल्या दिरंगाईसंदर्भात खा. नीलेश लंके यांनी गेल्या आठवडयात उर्जा समितीच्या बैठकीत प्रश्न उपस्थित करताना केंद्रीय उर्जा समितीच्या अधिकाऱ्यांनी नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाकडे धाव घेत या योजनेच्या कामाचा आढावा घेतला. केंद्रीय उर्जा समितीचे सदस्य असलेल्या खासदार नीलेश लंके यांनी समितीच्या बैठकीत सिंगल फेज योजना व एकूणच महावितरणच्या कामांमध्ये होत असलेल्या दिरंगाईबाबात प्रश्न उपस्थित करत तिव्र शब्दात नाराजी व्यक्त केली होती. खा. लंके यांच्या नाराजीची तात्काळ दखल घेत केंद्रीय उर्जा विभागाचे वरीष्ठ अधिकारी नगरमध्ये दाखल झाले. महावितरणच्या जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांना घेऊन ते पारनेरमध्ये दाखल झाले. खा. नीलेश लंके यांच्यासमवेत बैठक घेत विशेषतः सिंगल फेज योजनेसंदर्भात आढावा घेण्यात आला. या प्रश्नासंदर्भात दिल्ली येथे सबंधित ठेकेदाराच्या उपास्थितीत बैठक घेण्यात येऊन ठोस निर्णय घेण्याची ग्वाही केंद्रीय उर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

केंद्रीय उर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांस अधीक्षक अभियंता रमेश पवार, अधीक्षक अभियंता आराखडा श्री ढोबळे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, उपभियंता हतोळकर यांच्यासह दिल्लीच्या पॉवर फायनान्स कार्पोरेशनचे अधिकारीही यावेळी उपस्थित होते.

ठेकेदाराकडे क्षमता नाही

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात आरडीएसएस योजेअंतर्गत सिगल फेज योजना राबविण्यासाठी ७०० ते ८०० कोटी रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला. दोन वर्षांपूर्वी या योजनेची निविदा मंजुर झाली. मात्र हे काम करणाऱ्या ठेकेदाराकडे पुरेसे मनुष्य बळ अथवा सामग्रीही नसल्याने हे काम रेंगाळल्याची माहीती आहे.

दिल्लीत पुन्हा बैठक

सिंगल फेज योजनेच्या प्रश्नावर दिल्ली येथे ठेकेदाराच्या उपास्थितीत बैठक घेण्यात येईल. या बैठकीत ठेकेदाराकडून तातडीने काम करण्याची हमी घेण्यात येईल, ठेकेदाराकडून त्यात कुचराई झाल्यास त्याच्यावर कारवाई करण्यात येईल असेही या बैठकीत केंद्रीय उर्जा विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

विवेकानंद महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी

भद्रावती । प्रतिनिधी

स्थानिक विवेकानंद महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. जी. उमाटे होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून विदर्भ कोंकण ग्रामीण बँक, शाखा वरोरा येथील शाखा व्यवस्थापक प्रफुल्ल आत्राम, मराठी विभागातील डॉ. यशवंत घुमे प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक आत्राम म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य व विचार अंगीकृत करून तसे आदर्श ठेवून आपले जीवन जगले पाहिजे. त्यांचे आर्थिक क्षेत्रातील उदाहरणे, नियोजनातील उदाहरणे, व्यवस्थापनातील उदाहरणे आपण लक्षात घेऊन तसे आपल्या जीवनाचे नियोजन करीत गेलो तर आपणही यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही असे मत व्यक केले. यावेळी डॉ. यशवंत घुमे यांनी शिवाजी महाराजांची कृषीविषयक भूमिका मांडली. अध्यक्षीय विचार व्यक्त करताना प्राचार्य डॉ. उमाटे यांनी सांगितले की, आपण शिवचरित्राचा अभ्यास करून ते आत्मसात करावे. याप्रसंगी कु. जिनत पठाण , रोहित टेकाम या विद्यार्थ्यांनीही आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो अधिकारी डॉ. जयवंत काकडे, संचालन पूजा कोहरे, डॉ गजानन खामनकर यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ प्रकाश तितरे, डॉ रमेश पारेलवार यांच्यासह, संजय तामगाडगे, रोहित टेकाम, वैष्णवी बावणे, साहिल रंगारी, वैष्णवी पिंपळकर, अवंतिका कोलते, हर्षदा कोळापे, इत्यादी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.



महात्मा गांधी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये उत्साहात फूड फेस्टिवल

सोलापूर । प्रतिनिधी

महात्मा गांधी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दिनांक १८ फेब्रुवारी रोजी फूड फेस्टिवल उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ९.३० ते दुपारी १२ या वेळेत झालेल्या या फेस्टिवलमध्ये विद्यार्थ्यांसह पालकांनीही आनंद घेतला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांनी इडली-सांबर, वडापाव, समोसा, भेळ, पावभाजी, चना-चाट, चिप्स, चकली, गाजर हलवा, मँगो शिरा, राजगिरा लाडू, कुल्फी अशा विविध चविष्ट पदार्थांचे स्टॉल्स मांडले. विद्यार्थ्यांनी हे पदार्थ तयार करून विक्रीही केली, ज्यामुळे त्यांना व्यवहारज्ञान व गणनक्रिया आत्मसात करण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाचे उद्घाटन उपप्राचार्य अनिस बागवान आणि पर्यवेक्षक रमेश भोसले यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, आत्मनिर्भरता आणि नेतृत्वगुण वाढीस लागावे हा या उपक्रमाचा उद्देश होता. फूड फेस्टिवलच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



जि.प.प्रा.शाळा नाळेवस्ती येथे शिवजयंती उत्साहात साजरी

सोलापूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नाळेवस्ती येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जय शिवाजी, जय भारत घोषणांनी परिसर दुमदुमला.या सोहळ्यास सुरताल संगीत विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब नरारे, ग्रामपंचायत सदस्य शिवाजी नाळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जालिंदर नाळे, उपाध्यक्ष योगेश नाळे, शिक्षणप्रेमी अक्षय नाळे, मुख्याध्यापक संतोष पोतदार आणि अनुराधा शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर जय शिवाजी, जय भारत अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी पदयात्रा काढली. कार्यक्रमाच्या सांगता शिक्षणप्रेमी अक्षय नाळे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी कार्तिक नाळे, आर्यन नाळे, श्रेयस देवकते, रुद्र देवकते, श्रेयश नाळे, विरेन नाळे, श्रेया नाळे, विद्या नाळे, विश्वजीत नाळे, स्नेहल नाळे, शिवण्या बागडी, राजवीर येळे, अक्षय येळे, श्रुती येळे, प्रज्ञा नाळे, सिद्धी येळे आदी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक संतोष पोतदार व शिक्षक वृंदांनी विशेष मेहनत घेतली. आभार संतोष पोतदार यांनी मानले.



हिवरे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा



सोलापूर । प्रतिनिधी

हिवरे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शंभूराजे फरतडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिवरायांचा जीवनपट उलगडण्याचा छान प्रयत्न केला. विशेषतः मुलींनी शिवरायांचा पाळणा गात, वातावरण भारावून टाकले.या कार्यक्रमास मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, अंगणवाडी सेविका, मदतनीस, बचतगट सखी आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समिती व शिक्षक वृंदांनी विशेष मेहनत घेतली.

वैजापुर पंचायत समिती सभागृहात भव्य रक्तदान शिबिर



वैजापूर । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक भारती परिवारातर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला.शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी नगराध्यक्ष तथा जिल्हा बँक संचालक डॉ. दिनेश परदेशी उपस्थित होते. त्यांनी रक्तदात्यांचे कौतुक करत, रक्तदान हेच श्रेष्ठ दान असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी शिवप्रेमींना शुभेच्छा देत रक्तदात्यांना प्रमाणपत्रांचे वाटप केले.शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल शिक्षक भारती परिवाराचे अभिनंदन करण्यात आले. रक्तदान हे एक महान कार्य असून, त्यातून अनेकांना जीवनदान मिळते. अशा उपक्रमांना समाजाने मोठ्या प्रमाणावर पाठिंबा द्यावा, असे प्रतिपादन डॉ. दिनेश परदेशी यांनी केले.

नीळवस्ती शाळेत शिवजयंती निमित्त विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप

सोलापूर । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नीळवस्ती येथे उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी महाराजांविषयी आपल्या भावना व्यक्त करत सुंदर मनोगते सादर केली.

या विशेष प्रसंगी आई कमलाभवानी सामाजिक बहुउद्देशीय संस्था, करमाळा व डॉ. रोहन पाटील यांच्या वतीने विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. तसेच, खाऊचेही वितरण करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक तात्यासाहेब जाधव, शिक्षक मनोज दराडे व संपूर्ण शाळा परिवाराने परिश्रम घेतले. संस्थेच्या सहकार्याबद्दल शाळेच्या वतीने डॉ. रोहन पाटील यांचे आभार मानण्यात आले.



गोळवाडी येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

वैजापूर । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती वैजापूर तालुक्यातील विविध गावांप्रमाणे गोळवाडी येथेही मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.गावातील दक्षिणमुखी हनुमान मंदिर व ओमकारेश्वर महादेव मंदिर परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिषेक करून वंदन करण्यात आले.या सोहळ्यास गावाचे प्रथम नागरिक सरपंच भाऊसाहेब पाटील शिंदे, जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सभापती मनाजी पाटील मिसाळ, तसेच भगवान शिंदे, नानाभाऊ शिंदे, विक्रम शिंदे, बाबूलाल मांजरे, सचिन ताजी, गणेश बाळनाथ पगार, बाबासाहेब ठोंबरे (ग्रा. स. गोळवाडी), दगू आप्पा गावंडे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावकऱ्यांच्या सहभागाने हा सोहळा भक्तिमय आणि प्रेरणादायी ठरला.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सह्याद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .